IMPACT FACTOR (SJIF) 2021 = 7.380 ISSN 2319-4766

AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE,2022, VOL - 10, ISSUE - 53

मुंबई विद्यापीठ संलग्नित

रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे

**आर. पी. गोगटे कला व विज्ञान आणि आर. व्ही. जोगळेकर वाणिज्य महाविद्यालय, रत्नागिरी**

आणि

**मराठी समाजशास्त्र परिषद**

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

दिनांक 11-12 एप्रिल 2022

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे 31 वे राष्ट्रीय अधिवेशन

# भारतीय समाज आणि विकास प्रक्रिया

**संयोजक**

समाजशास्त्र विभाग

गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी

**मुख्य संपादक**

डॉ. पी. पी. कुलकर्णी


प्राचार्य - गोगटे - जोगळेकर महाविद्यालय ,रत्नागिरी

**संपादक**

प्रा. शिवाजी अशोक उकरंडे

सहाय्यक प्राध्यापक

समाजशास्त्र विभाग गोगटे-जोगळेकर महाविद्यालय,रत्नागिरी



PRINCIPAL

Dr. M. K. Umathe College

Nagpur - 440022

**RC 09** 445-500

| | | |
|---|---|---|
| 93 | महिला विरुद्ध हिंसा: समाजशास्त्रीय विश्लेषण<br>*डॉ. विनोद बी. खेडकर* | 453-449 |
| 94 | महिला आणि हिंसाचार<br>*राजूरकर सुमेध सुभाषराव* | 450-453 |
| 95 | हिंसा, गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार<br>*अमोल शशीकांत भोसले & डॉ. बी.एन. कावळे* | 454-456 |
| 96 | बालगुन्हेगारी : एक सामाजिक समस्या<br>*सविता सुदर्शन कोटूरी* | 457-460 |
| 97 | भारतातील बाल लैंगिक अत्याचाराच्या संदर्भात मुलांवरील अत्याचारांवरील अभ्यास<br>*शिल्पा प्रकाश जाधव* | 461-467 |
| 98 | महाविद्यालयीन प्राध्यापिकांचे कौटुंबिक हिंसाचाराविषयीच्या दृष्टीकोणाचे समाजशास्त्रीय विश्लेषण: विशेष संदर्भ आजरा, चंदगड व गडहिंग्लज तालुका<br>*जगदीश केशवराव ससाणे* | 468-475 |
| 99 | भ्रष्टाचार आणि त्यांची वेगवेगळी रुपे<br>*डॉ. दयानंद उत्तमराव राऊत* | 476-478 |
| 100 | भारतातील महिलांवरील हिंसाचार: एक मोठे आव्हान<br>*डॉ. रजनी वाढई* | 479-483 |
| 101 | भ्रष्टाचार: समाजशास्त्रीय आकलन<br>*डॉ. संतोष गोविंद गांगुर्डे* | 484-488 |
| 102 | महिलांवरील वाढता कौटुंबिक हिंसाचार<br>*भाग्यशाली रामसिंग डोंगरजाल* | 489-492 |
| 103 | कोरोनाकाळातील सामाजिक जीवन - एक समाजशास्त्रीय चिकित्सा<br>*रिद्धी संजय मुळये* | 493-497 |
| 104 | महिला गुन्हेगार आणि खुले कारागृह अध्ययन<br>*मनिषा आनंद भाकरे* | 498-500 |


DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

# महिला विरुद्ध हिंसा: समाजशास्त्रीय विश्लेषण

**डॉ. विनोद बी. खेडकर**

*सहाय्यक प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख, डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, नागपूर,*

*Email- khedkarvinod09@gmail.com मो. नं. ९४२१५३७१२३*

## गोषवारा

*भारतीय समाज परिवर्तनाच्या दिशेने अग्रेसर आहे. या परिवर्तना मध्ये सर्वात अधिक प्रभाव सामाजिक संस्थांवर पडला आहे. या सामाजिक संस्थांमध्ये कुटुंब आणि विवाह ह्या प्राथमिक संस्था आहेत. भारतामध्ये पूर्वी संयुक्त कुटुंब होते, तर विवाहास धार्मिक संस्कार मानत. हेच कारण होते की ना घटस्फोटाची समस्या होती, ना कुटुंब विघटनाची समस्या होती. अशा समाजात महिलांच्या विरुद्ध हिंसेला कोणतेही स्थान नव्हते. परंतु कालौघात भारतीय महिलांना समाजामध्ये दुय्यम स्थान प्राप्त झाले. त्यामुळे समाजातील कोणत्याही निर्णय प्रक्रियेत त्यांना स्थान दिले गेले नव्हते. अन्याय, अत्याचार किंवा महिला विरुद्ध कोणताही गुन्हा घडला तरी त्याला वाचा फोडण्याचे स्वातंत्र्य महिलांना नव्हते. परंतु वर्तमान स्थिती मध्ये शिक्षणाचे वाढते प्रमाण, विविध कायदे, समाजजागृती इत्यादींमुळे महिलांमध्ये जागृती निर्माण होऊन अन्याय, अत्याचाराविरुद्ध महिला आवाज उठवत आहेत.*

*गेल्या काही दशकांमध्ये महिलांप्रती गुन्हा किंवा हिंसेचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. हा समाजशास्त्रज्ञ, वैज्ञानिक व शासनासमोर चिंतेचा विषय बनत आहे. महिला उत्पीडन, बलात्कार, लैंगिक शोषण, हुंडाबळी, छेडछाड याचे प्रमाण वाढत आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या रिपोर्टनुसार, लॉकडाऊनच्या कालखंडामध्ये स्त्रियांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये ४६ टक्याने वाढ झाली आहे.१ याच दृष्टीकोनातून प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतामधील महिला अत्याचाराची व त्यांची स्थितीचा अभ्यास करणे तसेच स्त्रियांविरुद्धच्या हिंसेच्या स्वरूपाचे शोध घेणे आणि भारतामधील महिला विरुद्ध हिंसेची स्थिती तपासणे इत्यादींचा अभ्यास या शोधनिबंधामध्ये केला आहे. याकरिता वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करून तथ्य संकलनाच्या द्वितीय पद्धतीचा उपयोग केला आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनाचा आधार राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्युरो चे 2016-2020 चे वार्षिक प्रकाशन, क्राईम इन इंडिया आणि वेळोवेळी प्रकाशित आकडेवारीचा उपयोग केला आहे. तसेच राष्ट्रीय महिला आयोगाचा रिपोर्ट, सेन्सस, वर्तमानपत्रे, प्रकाशित साहित्य आणि पुस्तके इत्यादींचा व्दितीयक साधनांचा उपयोग केला आहे.*

***की वर्ड्स–*** *महिला हिंसा, गुन्हा व गुन्हेगारी, महिला अत्याचार*

---

## प्रस्तावना

महिला हिंसा ही एक गंभीर समस्या आहे. जी भारतातच नाही तर संपूर्ण विश्वामध्ये महिलांना प्रभावित करते. याचे मूळ भारतीय सामाजिक ढांचामध्ये आहे. ज्याचा संपूर्ण समाजामध्ये विस्तार झाला आहे. आज भारत अनेक सामाजिक समस्यांचा सामना करत असून, या समस्यांमध्ये गुन्हेगारी ही महत्त्वाची समस्या आहे. गुन्हा हा समाज विरोधी कार्य असून प्रत्येक समाजामध्ये गुन्हा कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आढळतो. परंतु गेल्या कांही दशकांमध्ये महिला विरुद्ध हिंसेचे प्रमाण वाढत आहे. भारतीय संविधानाने स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच समान हक्क दिलेले आहेत, कायद्याने संरक्षण दिलेले आहे तरीही आज स्त्रियांना दुय्यम दर्जा व समानतेचा अनुभव येत आहे.[२] स्त्रियांचा अपमान, शोषण, दमण, अत्याचार यास प्राचीन परंपरा दिसून येते. स्त्री- शिक्षण, तांत्रिक व वैज्ञानिक विकास, सामाजिक अधिनियम, घटनात्मक तरतुदी इत्यादींमुळे स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोनाता काही अंशी बदल झालेला असला, तरी आजही स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रांत समानतेची वागणूक दिली जात नाही. तिची उपेक्षा करणे, त्रास देणे, मारहाण करणे, जन्माला येण्याअगोदर मारणे, लैंगिक, शारीरिक व मानसिक शोषण करणे अशा अत्याचारास आजही स्त्रिया मोठ्या प्रमाणात बळी पडतात. आधुनिक भारतात स्त्रियांचे योगदान पुरुषांच्या बरोबरीचे आहे. राजकारण, समाजकारण, प्रशासकीय सेवा व कार्पोरेट क्षेत्र इत्यादी सर्व क्षेत्रांमध्ये स्त्रियांनी आपली कार्यक्षमता आणि बौद्धिक क्षमता दाखवली आहे. परंतु, दुसरीकडे कितीही विकसित असलो तरी, आपली मानसिकता अजूनही स्त्रियांप्रती भेदभावपूर्ण असलेली दिसते. यातूनच स्त्रीयांविरुद्धचा गुन्ह्यामध्ये वाढ होताना दिसते. महिला उत्पीडन, सामूहिक बलात्कार, अपहरण, लैंगिक शोषण, विनयभंग, हुंड्यासाठी जाळणे, मारझोड करणे, आत्महत्येस प्रवृत्त करणे आणि अनैतिक व्यापार करण्यास प्रवृत्त करणे. अशा घटनांमध्ये अधिक वाढ होत आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या रिपोर्टनुसार २०२१ मध्ये आठ महिन्यांचा कालावधीत (जानेवारी ते ऑगस्ट) महिलांच्या विरुद्ध हिंसेच्या १९९५३ गुन्हे घडले आहेत. ज्यामध्ये महाराष्ट्रात ९७४ घटना

DR. M. K. UMATHE NAGPUR COLLEGE

घडल्या आहेत.३ स्त्रीयांविरुद्धच्या गुन्ह्यांना दोन गटांमध्ये विभागले जाते एक भारतीय दंड संहीत्येअंतर्गत येणारे गुन्हे (Indian Penal Code) त्यामध्ये बलात्कार, अपहरण व पळून नेणे, हुंडाबळी, पती व पतीच्या नातेवाईकांकडून होणारा शारीरिक आणि मानसिक छळ, विनयभंग, लैंगिक छळ व त्यामुळे होणारा खून, खुनाचा प्रयत्न आणि आत्महत्येस प्रवृत्त करणे इत्यादी. तर दोन स्थानिक व विशेष कायद्यानुसार गुन्हे (Special & Local laws) यामध्ये अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा 1956, हुंडा प्रतिबंध कायदा 1961, बालविवाह प्रतिबंधक कायदा सुधारित 1979, स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन कायदा 1986 आणि सती प्रतिबंधक कायदा 1987 इत्यादी. या अंतर्गत सर्व गुन्ह्यांमध्ये स्त्रियांचे बळी पडण्याचे प्रमाण अधिक आहे. क्राईम इन महाराष्ट्रामध्ये असे म्हटले आहे की, स्त्रिया या खून दरोडा यासारख्या अनेक गुन्ह्यात बळी पडतात त्या गुन्ह्यास स्त्रिया विरोधी गुन्हे म्हटले जात नाही. तर अशाच गुन्ह्यांना स्त्रियांविरुद्धचा गुन्हा असे संबोधण्यात येते की, ज्यामध्ये फक्त स्त्रीच बळी पडू शकते. संपूर्ण विश्वामध्ये प्रत्येक तीन मध्ये एक पंधरा वर्षावरील महिला कोणत्या ना कोणत्या हिंसेची बळी ठरली आहे. संयुक्त राष्ट्राच्या आकडेवारीनुसार महिलांच्या विरुद्ध हिंसेचे 74 करोड पेक्षा अधिक घटना प्रकाशात आल्या आहेत. की ज्या कोरोना महामारी पेक्षाही भयावह आहेत. NCRB 2020 च्या रिपोर्टनुसार देशभरात कौटुंबिक हिंसाचाराचे १.१ लाख घटना घडल्या असून पश्चिम बंगाल (१९९६२) उत्तरप्रदेश (१४४५४) आणि राजस्थान (१३७६५) घटना घडल्या आहेत. यावरून असे लक्षात येते की स्त्रियाविरुद्ध गुन्ह्याचे प्रमाणामध्ये वृद्धी होताना दिसत आहे. याच दृष्टिकोनातून प्रस्तुत शोधनिबंध "महिला विरुद्ध हिंसा: समाजशास्त्रीय विश्लेषण" हा विषय संशोधकाने अध्यायना करिता समस्या म्हणून निवडला आहे.

## संशोधन पद्धती

### संशोधनाचे उद्देश

१. भारतात स्त्री विरुद्ध हिंसेच्या स्थितीचे अध्ययन करणे.

२.वर्ष 2016 ते 2021 या कालावधीतील स्त्रीविरुद्ध हिंसेच्या स्वरूपाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

### संशोधनाचे अध्ययन क्षेत्र

प्रस्तुत संशोधनाकरिता अध्ययन विश्व म्हणून संपूर्ण भारतातील महिला विरुद्ध हिंसेच्या घटनांचे अध्ययन केले आहे.

### तथ्य संकलनाचे स्त्रोत

प्रस्तुत अध्ययना करीता तथ्य संकलनाच्या स्त्रोतांपैकी दुय्यम स्त्रोताची निवड केली आहे. या संशोधनामध्ये महिला विरुद्ध हिंसेचे अध्ययन केले असून यांची NCRB च्या इंडियन क्राईम रिपोर्ट व महिला आयोगाच्या रिपोर्ट आधारे अध्ययन केले आहे. तसेच विविध वर्तमानपत्रे, संशोधन ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके व इंटरनेट इत्यादींचा उपयोग केला आहे.

### संशोधन आराखडा

संशोधन आराखडा संशोधनातील महत्त्वाची पायरी असून, संशोधकाला संशोधन कार्याचा पद्धतशीर नियोजन, संशोधानाचो रूपरेषा, मांडणीचे स्वरूप निश्चित करावे लागते. प्रस्तुत संशोधनाकरिता वर्णनात्मक संशोधन आराखड्याची निवड केली आहे.

### तथ्यांचे विश्लेषण

**भारतात एकून नोंद झालेल्या गुन्ह्यात स्त्रियांविरुद्ध गुन्ह्यांचे प्रमाण**

| अ. क्र. | वर्ष | भारतीय दंड सहिंतेअंतर्गत व स्थानिक विशेष कायद्यानुसार एकूण गुन्हे (IPC & SLL crime) | स्त्रीयांविरुद्धचे गुन्हे (IPC & SLL Crime) | एकूण प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | २०१६ | २९७५७११ | ३३८९५४ | ११.३९ % |
| २ | २०१७ | ३०६२५७९ | ३५९८४९ | ११.७४ % |
| ३ | २०१८ | ३१३२९५५ | ३७८२३६ | १२.०७ % |
| ४ | २०१९ | ३२२५५९७ | ४०५३२६ | १२.५६ % |
| ५ | २०२० | ४२५४३५६ | ३७१५०३ | ८.७३ % |
| Source- Crime in India, 2016 to 2020, National Crime Records Bureau, Ministry of Home Affairs | | | | |
| ६ | २०२१ (जानेवारी ते ऑगस्ट) | | ३१००० | |
| स्त्रोत- राष्ट्रीय महिला आयोग | | | | |

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

वरील तक्त्यानुसार भारतातील एकूण नोंद झालेल्या गुन्ह्यात स्त्रीयांविरुद्धचा गुन्ह्याच्या प्रमाणाचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, वर्ष 2016 मध्ये IPC & SLL Crime नुसार एकूण २९७५७११ गुन्हेगारी घटनांची नोंद झाली असून, पैकी ३३८९५४ ह्या महिला विरुद्ध गुन्ह्यांच्या घटना आहेत. हे एकूण प्रमाण ११.३९ टक्के इतके आहे, तर 2017 मध्ये हे प्रमाण ११.७४ टक्के असून 2018 मध्ये हे प्रमाण १२.०७ टक्के आहे. तर 2019 मध्ये स्त्रीयांविरुद्धचे गुन्ह्यांचे प्रमाण १२.५६ टक्के असून 2020 मध्ये एकूण ४२५४३५६ गुन्हेगारी घटना घडल्या असून, पैकी स्त्रियांविरुद्ध गुन्ह्याच्या ३७१५०३ घटना घडल्या आहेत. याचे एकूण प्रमाण ८.७३ टक्के आहे.

यावरून असे दिसून येते की, २०१६ ते २०२० या कालावधीमध्ये स्त्रिया विरुद्ध गुन्ह्याचे प्रमाणात प्रत्येक वर्षी वृद्धी होत आहे. २०२० मध्ये घडलेल्या घटनांचे प्रमाण पाहिले असता राष्ट्रीय महिला आयोगाने नुसार मार्च नंतरच्या महिलांवरील अत्याचाराचें व गुन्ह्याचे प्रमाण हे सर्वाधिक आहे. कारण या कालखंडामध्ये देशांमध्ये लॉकडाऊन होते. तसेच २०२१ च्या जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांच्या कालखंडामध्ये स्त्रियांविरुद्धच्या गुन्ह्यांचे प्रमाण ३१००० इतके आहे. जे गेल्या वर्षीच्या या कालावधीतील हुन्हांपेक्षा ४६ टक्के अधिक आहे. यातील अर्ध्यापेक्षा अधिक घटना एकट्या उत्तरप्रदेश राज्यातील आहेत. त्यानंतर महाराष्ट्र, राजस्थान, पश्चिम बंगाल आणि ओरीसा ही राज्य येतात. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा रेखा शर्मा यांनी असे सांगितले की या वाढणाऱ्या घटनांचे कारण शोधले असता ताण-तणावा मध्ये वाढ, अनेकांच्या नोकऱ्या गेल्या मुळे आर्थिक समस्या, कुटुंबाकडून मिळणाऱ्या मानसिक आधाराची कमतरता इत्यादी कारणांमुळे गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. महिला अधिकार कार्यकर्ता योगिता भयान यांनी स्त्रीयांविरुद्ध गुन्ह्यांमध्ये वृद्धी होण्याचे मुख्य कारण सांगितले की, महिलांमध्ये अत्याचाराविषयी जागरुकता वाढली आहे. त्यामुळे पीडित महिला ही त्वरित संबंधित यंत्रणेकडे घटनेची नोंदणी करते.

वरील तक्त्यानुसार राज्यानुसार स्त्रियांविरुद्ध गुन्ह्यांचे प्रमाण पहिले असता असे दिसून येते की, सर्वाधिक उत्तरप्रदेश मध्ये ४९३८५ घटना घडल्या असून त्यापाठोपाठ पश्चिम बंगाल ३६४३९, राजस्थान ३४५३५, महाराष्ट्र ३१९५४ मध्यप्रदेश २५६४०, ओडीसा २५४८९ व आंध्रप्रदेश १७०८९ इत्यादी राज्यांमध्ये स्त्रियांविरुद्ध गुन्ह्यांचे प्रमाण अधिक असलेले दिसते. यापैकी क्षेत्रफळ व लोकसंख्येचा विचार केला असता ओडिशा व आंध्रप्रदेश मध्ये महिला विरुद्ध गुन्ह्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**भारतात स्त्रियांविरुद्धच्या गुन्ह्यांचे स्वरूप**

| अ.क्र. | गुन्ह्याचा प्रकार | वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१६ | २०१७ | २०१८ | २०१९ | २०२० |
| १ | बलात्कार | ३९०६८ | ३३६५९ | ३३९७७ | ३२२६० | २८१५३ |
| २ | अपहरण व पळवून नेणे | ६६५४४ | ६८७३५ | ७५३३३ | ७३८४४ | ६३६९३ |
| ३ | हुंडाबळी | ७६२८ | ७८३८ | ७२७७ | ७१६२ | ७०४५ |
| ४ | पती व पतीच्या नातेवाईकां कडून होणारा शारीरिक व मानसिक छळ | ११०४३४ | १०७४५८ | १०४१६५ | १२६५७५ | १११२९२ |
| ५ | विनयभंग | ८५३३२ | ८७९२४ | ९००३९ | ८९२९२ | ८६७४५ |
| ६ | लैंगिक छळ | २७४२२ | -- | -- | -- | ४६५२७ |
| ७ | मुलींची आयात | -- | ३५२८ | ३३४८ | ३१८९ | २४८० |
| ८ | ॲसीड अटॅक | २२५ | १४८ | १३६ | १५६ | १०९ |
| ९ | अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ | ३१८९ | २२७८ | २०८९ | १८४५ | १३२५ |
| १० | हुंडा प्रतिबंध कायदा १९६१ | ९६८३ | १०३७५ | १३२७५ | १३६७४ | १०४८८ |
| ११ | स्त्रियांचे अश्लिल प्रदर्शन प्रतिबंधक कायदा १९८६ | ३९ | २८ | २२ | २३ | १२ |
| १२ | आत्महत्येस प्रवृत्त करणे | ४४८५ | ५४६७ | ५२६६ | ५०८८ | ५१३२ |

Source- Crime in India, 2016 to 2020, National Crime Records Bureau, Ministry of Home Affairs

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

वरील तक्त्यानुसार भारतात स्त्रीयांविरुद्ध गुन्ह्यांच्या स्वरूपाचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, २०१६ ते २०२० या कालखंडामध्ये बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये घट झालेली दिसते. परंतु ही घट फार अपेक्षित अशी नाही. तसेच २०२१ च्या जून महिन्यापर्यंत ची गुन्ह्याच्या घटना पाहिल्या असता 830 बलात्काराच्या घटना या सहा महिन्यात घडल्या आहेत. ज्या जून २०२० पर्यंतच्या तुलनेने अधिक आहेत. तसेच अपहरण आणि पळवून नेण्याच्या गुन्ह्यांमध्ये काही प्रमाणात कमी-अधिक प्रमाण असलेले दिसते. यामध्ये पैशासाठी अपहरण करणे, लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेणे आणि शेती किंवा प्रॉपर्टीच्या वादातून अपहरण केल्याचे प्रमाण अधिक आहे. परंतु अपहरण करून त्यांच्यावर बलात्कार करणे व त्यांना जीवे मारण्याचे प्रमाण अगदी नगण्य असल्याचे आढळून आले. २०१६ ते २०२० या कालखंडामध्ये हुंडाबळीच्या गुन्ह्याच्या घटना ह्या २०१७ मध्ये अधिक ७८३८ घडल्या आहेत. त्यातूनतेत २०२० मध्ये हे प्रमाण कमी ७०४५ आहे. 2020 मध्ये पती व पतीच्या नातेवाईकांकडून होणारा शारीरिक व मानसिक छळाचे गुन्हे हे २०१६, २०१७ व २०१८ च्या तुलनेत अधिक असून २०१९ च्या तुलनेत हे प्रमाण कमी आहे. परंतु राष्ट्रीय महिला आयोगाने नुसार हे प्रमाण अधिक असलेले दिसते. कारण, अनेक महिलांनी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद न करता महिला आयोगाच्या हेल्पलाइन वरती मदत मागितली आहे. तसेच २०२० मध्ये लैंगिक छळाच्या गुन्ह्याची नोंद ही ४६५२७ इतकी झालेली असून यामध्ये घरातील सदस्य, नातेवाईक व शेजारच्या लोकांचा सहभाग असलेला दिसतो. तसेच यामध्ये १५ ते १८ या वयोगटातील मुलींचे प्रमाण अधिक असून त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढणे, तसेच हे वय मुलींच्या शारीरिक बदलाचे असून त्यांना इतर नात्यांप्रती असलेली ओढ यातून बळी गेलेल्या दिसतात. तसेच विनयभंगाच्या गुन्ह्यांचा शोध घेतला असता, याचे प्रमाण अधिक असून यातील काही घटना ह्या बदल्यांच्या भावनेतून नोंद झालेल्या असल्याचे आढळते. तसेच ॲसिड अटॅक, अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, हुंडा प्रतिबंध कायदा, स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंधक कायदा या अंतर्गत गुन्ह्यांच्या नोंदी झालेल्या आहेत.

यावरून असे दिसून येते की भारतात स्त्रीयांविरुद्धच्या गुन्ह्यांच्या स्वरूपामध्ये पती व पतीच्या नातेवाईकांकडून शारीरिक व मानसिक छळ, विनयभंग, अपहरण व पळवून नेणे, बलात्कार, लैंगिक छळ, हुंडाबळी व आत्महत्येस प्रवृत्त करणे इत्यादींचे प्रमाण सर्वाधिक आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या रिपोर्टनुसार २०२१ च्या पहिल्या आठ महिन्यात (जानेवारी ते ऑगस्ट) २०२० च्यातुलनेत स्त्रीयांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये ४६ टक्क्यांनी वृद्धी झाली आहे. यामध्ये सर्वाधिक ७०३६ गुन्हे हे सन्मानाने जीवन जगण्याच्या अधिकारावर गदा आणणारे होते, तर ४२८९ गुन्हे कौटुंबिक हिंसाचार अंतर्गत, तर २९२३ गुन्हे विवाहानंतर मारझोड करणे व हुंड्या संबंधित आहेत. म्हणजेच आजही महिलांना त्यांच्या जीवन जगण्याच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यात येत आहे.

**निष्कर्ष-**

स्त्री ही समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. भारतीय समाजाचा विचार करता वैदिक पूर्वकाळात आणि नंतर काही काळ स्त्रीला बरोबरीचे स्थान दिले होते. परंतु नंतरच्या काळात प्रामुख्याने एक स्त्री म्हणून तिच्याकडे पाहण्याचा पुरुषांचा दृष्टिकोन व पितृसत्ताक व्यवस्थां समाजात असल्यामुळे तिला मिळालेले दुय्यम स्थान यामुळे तिला अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. यामधूनच स्त्रियांविरुद्ध मोठ्या प्रमाणात गुन्हे घडत गेले व या गुन्ह्यात स्त्रीचे बळीचे प्रमाण अधिक वाढत गेले. २००१ ते २०२० या दोन दशकातीत स्त्रियांविरुद्धच्या गुन्ह्यांचे प्रमाण हे सातत्याने वाढले आहे व आजतागायत ते वाढत आहे. राष्ट्रीय महिला आयोग व नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर्सच्या रिपोर्टनुसार भारतामध्ये सातत्याने महिलांविरुद्धच्या हिंसेच्या प्रमाणामध्ये वृद्धी होत आहे. भारतातील प्रमुख राज्य ज्यामध्ये उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश, पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश आणि ओरिसा इत्यादी राज्यांमध्ये स्त्रियांविरुद्ध गुन्ह्याचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले. तसेच दिल्ली, कानपुर, बेंगलोर, चेन्नई व कोलकाता व मुंबई ही शहरे गुन्ह्यांमध्ये अग्रेसर आहेत. तसेच स्त्रियांविरुद्ध गुन्ह्यांच्या स्वरूपाचा अभ्यास केला असता असे दिसते की, पती व पतीच्या नातेवाईकांकडून होणारा शारीरिक व मानसिक छळ, विनयभंग, आत्महत्येस प्रवृत्त करणे, अपहरण व पळवून नेणे आणि बलात्काराचे प्रमाण सर्वाधिक आहे. मार्च २०२० ते ऑगस्ट २०२१ या कालखंडामध्ये covid-19 चा काळ असल्याने लॉकडाऊनची स्थिती होती. या काळात बहुतांश महिला या घरातच अडकून पडल्या होत्या. या काळात त्यांच्यावरील अत्याचाराचे प्रमाण अधिक वाढले आहे. राष्ट्रीय

महिला आयोगाकडे आलेल्या तक्रारींमध्ये पतीकडून व नातेवाईकांकडून होत असलेली मारहाण, नातेवाईकांकडून (दीर, सासरा व नंदावा) यांच्याकडून होणारा लैंगिक छळाचे प्रमाण अधिक आहे. म्हणजेच आजही महिलांना त्यांच्या सन्मानाने जीवन जगण्याच्या अधिकारापासून कोसो दूर ठेवण्याचा प्रयत्न होत आहे.

## संदर्भ सूची

*thewirehindi.com/185424/46-percent-rise-in-complaints-of-crimes-against-women-so-far-this-year-new. dated 08/09/2021.*

*रघुवंशी, राजेश. महिलांसाठी अत्यावश्यक कायदे, पुणे: आयुर्विद्या मुद्रणालय. पृ. क्र. १.*

*thewirehindi.com/185424/46-percent-rise-in-complaints-of-crimes-against-women-so-far-this-year-new. dated 08/09/2021.*

## संदर्भ ग्रंथसूची

आहुजा, राम. आहुजा, मुकेश. २०१५. *विवेचनात्मक अपराधशास्त्र,* जयपूर: रावत पब्लिकेशन्स.

परांजपे, ना. वि. २०१७. *अपराधशास्त्र, दण्ड प्रशासन एंव प्रपीडनशास्त्र,* इलाहाबाद: सेन्ट्रल लॉ पब्लिकेशन्स.

बघेल, डी. एस. २०१८. अपराधशास्त्र, दिल्ली: विवेक प्रकाशन.

काळदाते, सुधा. गोटे-गव्हाणे, शुभांगी. २००३. *गुन्हेगारीचे समाजशास्त्र (अपराधशास्त्र),* पुणे: श्रीविद्या प्रकाशन.

Devasia, V.V. Devasia, Leelamma. 1989. *'Female Criminals and Female Victims: An Indian Perspective',* Nagpur: Dattsons Publishers

**Reports**

Crime in India 2016, National Crime Records Bureau, Ministry of Home Affairs.

Crime in India 2017, National Crime Records Bureau, Ministry of Home Affairs.

Crime in India 2018, National Crime Records Bureau, Ministry of Home Affairs.

Crime in India 2019, National Crime Records Bureau, Ministry of Home Affairs.

Crime in India 2020, National Crime Records Bureau, Ministry of Home Affairs.

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022